कालमर्यादित

क्र/यजिप/साप्रवि/पंचायत/आस्था-१/912/२०१९
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
( पंचायत विभाग )
यवतमाळ दिनांकः-22/05/२०१९

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती-----------------सर्व.

**विषयः-** पंचायत विभागा अंतर्गत वर्ग ३ च्या नियतकालन प्रशासकिय बदलीबाबतची अंतीम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्र/यजिप/साप्रवि/पंचायत/आस्था-१/ १३०५/२०१९ दि.०२/०५/२०१९.

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने पंचायत विभागा अंतर्गत कार्यरत वि.अ.पं/ ग्राविअ/ ग्रा.से. यांची सन २०१९ या वर्षाचे प्रशाकिय बदलीबाबतची तात्पुरती वास्तव्य सेवा कालावधीची ज्येष्ठता यादी जिल्हा परिषद यवतमाळ च्या संकेतस्थळावर व कार्यालयाच्या ई-मेल वर पाठविण्यात आलेली होती.सदर यादीवर दिनांक १०/५/२०१९ पर्यत आक्षेप मागविण्यात आलेले होते.प्राप्त झालेल्या आक्षेपाचे अनुषंगाने तात्पुरत्या सेवा कालावधीच्या जेष्ठता यादीत दुरुस्ती करुन याव्दारे अंतिम वास्तव्य सेवा कालावधीची जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर अंतिम यादी जिल्हा परिषद यवतमाळ च्या zpyavatmal@gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असुन ई-मेल व्दारे पाठविण्यात येत आहे.सदर यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी.यादी नुसार सुट प्राप्त कर्मचा-यांना बदली करीता समुपदेशनाच्या दिवशी आवश्यक कागदपत्र / पुराव्यासह उपस्थित राहणाच्या हि सुचना द्याव्यात बदली संदर्भात सुट प्राप्त कर्मचा-यांने आवश्यक पुरावे सादर न केल्यास व अश्या कर्मचा-यांची बदली झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित कर्मचा-यांची राहील याची संबधितास जाणिव करुन द्यावी.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

**प्रतिलीपी :-**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**